महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१

मासं/रवका/न.क्र.०९ /३३२८२
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,
माटुंगा, मुंबई ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३
**दिनांक: २७.१२.२०२२**

# परिपत्रक

**विषय: कंपनीतील अधिकारी व कर्मचारी यांना अदा होणाऱ्या रक्कमेच्या अतिप्रदानाबाबत.**

**संदर्भ:** शासन परिपत्रक क्रमांक वेतन-१०१८/प्र.क्र.३४/सेवा-३ दि.०७.१०.२०२२.

राज्य शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवाकाळात होणाऱ्या अतिप्रदानाच्या रकमेची वसुली क्षमापित (Exemption from recovery of excess payment) करण्याबाबत मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल केलेल्या याचिका क्रमांक ३४८०/२०२० चा निकाल दि.१५.०९.२०२१ रोजी न्यायालयाने दिलेला आहे. सदर निकालात अधिकारी व कर्मचारी यांच्या अतिप्रदान रक्कमेच्या अनुषंगाने अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून वचनपत्र घेण्याबाबतच्या सूचना महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, यांचे शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.५२/सेवा-३ दि.२२.११.२०२१ अन्वये पारित केलेल्या आहेत. त्या अनुषंगाने कंपनीचे परिपत्रक क्र.मासं/रवका/न.क्र.९/१०१२९ दि.२५.०४.२०२२ अन्वये सूचना पारित केलेल्या आहेत.

२. महावितरण कंपनी अंतर्गत कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचारी यांना त्यांच्या सेवाकाळामध्ये वेतन, भत्ते, वेतन/ भत्त्याचा फरक, सोईसवलती, सेवानिवृत्तीचे लाभ इत्यादी अदा करताना काही प्रसंगी रक्कमांचे अतिप्रदान होण्याची शक्यता नाकारता येत नाही व सदर अतिप्रदानाची वसुली वेळेवर होणे गरजेचे आहे. या अनुषंगाने कंपनीतील अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून सदर अतिप्रदानीत रकमेची वसुली वेळेवर होण्याकरीता उपरोक्त दि.०७.१०.२०२२ च्या शासन निर्णयाच्या धर्तीवर सक्षम अधिकारी यांनी खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यास मंजूरी प्रदान केलेली आहे.

क) पगारपत्रक लिपीक यांनी दरवर्षी मे महिन्यात सेवापुस्तकांची व सेवापटांची वार्षिक पडताळणी करुन त्याबाबतचे प्रमाणपत्र (परिशिष्ट -'अ' नुसार) सेवापुस्तकात जोडणे आवश्यक आहे. त्यानुसार कार्यवाही होत आहे याची विभाग प्रमुख व लगतच्या वरीष्ठ कार्यालयातील मानव संसाधन प्रमुख यांनी खात्री करावी, असे केल्यास भविष्यात अतिप्रदानाचे प्रसंग उद्भवणार नाहीत. तसेच पत्र क्र. HR/O&M/HR-Inpsection/11823 dt. 25.06.2020 नुसार सेवापुस्तकांची पडताळणी करणेबाबत दिलेल्या सूचनांचे संबंधित तपासणी अधिकारी यांनी काटेकोरपणे पालन करावे.

ख) प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांच्या वयाच्या ५० व्या वर्षी पगारपत्रक लिपीक यांनी न चुकता त्यांच्या सेवापुस्तकांची/ सेवापटांची पडताळणी करावी. जेणेकरुन त्यांच्या वेतननिश्चितीतील त्रुटी वेळीच दूर करता येतील: वयाची ५० वर्षे पूर्ण करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके पगारपत्रक लिपीकाकडून पडताळणी वेळेत करुन घेण्याची जबाबदारी विभाग प्रमुखाची राहील. जेणेकरुन कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीनंतर,पूर्वीच्या अतिप्रदानाची वसुली करण्याची वेळ येणार नाही.

ग) सर्वसाधारणत: वेतन पडताळणी पगारपत्रक लिपीक मार्फत दर पाच वर्षांनी कंपनीत सुधारित वेतन लागू झाल्यानंतर सेवापुस्तक/ सेवापटांची पडताळणी करण्यात येते. मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश विचारात घेता अतिरिक्त प्रदानाची वसुली ५ वर्षात करणे आवश्यक असल्याने ही वसुली करणे

शक्य व्हावे याकरिता लगतवरच्या कार्यालयातील मानव संसाधन विभागाच्या वरीष्ठ अधिकारी यांनी दर २ वर्षानी सेवापुस्तकाची/ सेवापटांची पडताळणी न चुकता करावी. जेणेकरुन त्यांच्या वेतननिश्चितीतील त्रुटी दूर करता येतील व अतिरिक्त प्रदानाची वसुली करणे देखील शक्य होईल.

घ) प्रत्येक कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या नियंत्रणाखाली कार्यरत असलेले अधिकारी व कर्मचारी यांना सेवापुस्तके दरवर्षी दाखविण्याबाबत आणि त्यांनी सेवापुस्तके तपासली असल्याचे द्योतक म्हणून त्यांची दिनांकीत स्वाक्षरी सेवापुस्तिकेत घेण्याबाबतची कार्यवाही करणे आवश्यक राहील.

च) कंपनीचे परिपत्रक क्र.मासं/रवका/न.क्र.९/१०१२९ दि.२५.०४.२०२२ अन्वये संबंधित कर्मचाऱ्याकडून आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी वचनपत्र घेण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच नव्याने सेवेत येणाऱ्या कर्मचारी व अधिकारी यांच्याकडून वचनपत्र वेळीच घेण्याची कार्यवाही देखील आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी करावी.

छ) कंपनीचे परिपत्रक क्र.मासं/रवका/न.क्र.९/१०१२९ दि.२५.०४.२०२२ अन्वये वचनपत्र घेण्याबाबतच्या परिपत्रकापूर्वी झालेल्या अतिप्रदानाच्या वसुलीच्या बाबतची प्रकरणे निदर्शनास आल्यानंतर संबंधित कार्यालयांनी प्रकरणनिहाय तपासणी करुन त्याबाबत वसुलीची कार्यवाही करावी व वसुली होवु न शकणाऱ्या प्रकरणांचा तपशील मुख्य अभियंता/ मुख्य महाव्यवस्थापक (मासं) यांना तात्काळ सादर करावा.

३. सदर परिपत्रक कंपनीच्या e-library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

सोबत: शासन निर्णय दि.०७.१०.२०२२ व परिशिष्ट - 'अ' जोडले आहे.

( भूषण कुलकर्णी )
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (संचलन)/ (वित्त)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.

३) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.

४) कार्यकारी संचालक (मासं)/ (सुवअं)/ (वित्त)/ (महसूल व देयके) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ (सांघिक वित्त)/ (अंतर्गत लेखा परिक्षण) / (सांघिक लेखा) /(माहिती तंत्रज्ञान) /
(मुख्य तपास अधिकारी), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.

३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.

४) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/ (मासं-मासंव्यप्र) /(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

अतिप्रदान रकमेच्या अनुषंगाने शासकीय
कर्मचाऱ्याकडून वचनपत्र घेण्याबाबत...

# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग
## शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण-२०२१ / प्र. क्र. ५२ /सेवा-३

मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२
तारीख: २२.११.२०२१

**वाचा -**

१) सिव्हील अपील क्रमांक ३५०० / २००६ (पंजाब व हरीयाणा उच्च न्यायालय व इतर विरुद्ध जगदेव सिंग ) यामधील मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांचा दिनांक २९.०७.२०१६ चा अंतिम निर्णय

२) मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल झालेल्या याचिका क्रमांक ३४८०/२०२० मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.१५.०९.२०२१ रोजी दिलेला न्यायनिर्णय

३) अतिरिक्त सरकारी वकील, मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचे पत्र क्रमांक जीपीएचसीएबीडी/उब्ल्यूपी/७६६५/२०२१, दि.२१.०९.२०२१

**प्रस्तावना -**

गट-अ, गट-ब, गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड मधील राज्य शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना, त्यांच्या सेवाकाळामध्ये विविध प्रसंगी, त्यांना नियमानुसार अथवा कायद्यानुसार देय व अनुज्ञेय ठरत नसतांना (Excess of their entitlements), शासकीय रकमांचे अतिप्रदान (Excess payment) होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आलेले आहे. काही प्रसंगी अतिप्रदान झाल्याचे, भविष्यात आढळून आल्यास, अशा अतिप्रदानाची रक्कम, कर्मचारी शासनास परत करेल, अशा आशयाचे वचनपत्र (Undertaking), संबंधित शासकीय कर्मचाऱ्याकडून घेतले जाणे आवश्यक असतांना काही प्रकरणी वचनपत्र घेतले गेले नाही. परिणामी, अशा अतिप्रदानित रकमेची वसुली सुरु केल्यास कर्मचारी त्यास विरोध करत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे.

**परिपत्रक -**

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना, त्यांच्या सेवा काळात होणाऱ्या अतिप्रदानाच्या रकमांची वसुली क्षमापित (Exemption from recovery of excess payment) करण्याबाबतच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल झालेल्या याचिका क्रमांक ३४८०/२०२० मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.१५.०९.२०२१ रोजी आदेश पारीत केले आहेत. मा. उच्च न्यायालयाच्या सदर आदेशातील परिच्छेद क्रमांक ९ व १० खालीलप्रमाणे आहे.

"9. Before Parting with this matter, we deem it appropriate to record that we are coming across such cases practically everyday. Most of the cases are in connection with the various zilla parishads and State instrumentalities. In most of the cases, there is no undertaking executed by the beneficiary. We cannot ignore the fact that in such cases, the employee, though disentitled, has pocketed the tax payers amount.

10. We, therefore, deem it appropriate to direct the Chief Secretary of the State of Maharashtra to issue appropriate directions to all the departments of the State Government and local authorities/bodies, to mandate executing of undertakings from employees, who would be beneficiaries of pay fixation or calculations of increments or any similar calculations with regard to monetary benefits. It shall be stated that in such undertakings that they would refund excess amounts if subsequently found to have been paid in excess. This would be in the interest of the State Exchequer and would also control excess payments which cannot be recovered subsequently. The Chief Secretary shall consider the judgement delivered by the Hon'ble Apex Court in *Jagdev Singh* (Supra), wherein the Hon'ble Apex Court has concluded that if an undertaking is executed by such a beneficiary at the time of receiving monetary benefits, he would be liable to repay the said amount to the employer. "

शासकीय खजिन्यातील निधी हा करदात्यांकडून जमा करण्यात आलेला सामान्य जनतेचा पैसा आहे. कोणत्याही प्रकारे करदात्यांच्या पैशांचा अपव्यय होणार नाही, या दृष्टीने भविष्यात वसुल न होऊ शकणाऱ्या अतिप्रदान होणाऱ्या रकमेस पायबंद घालणे गरजेचे आहे. ही बाब विचारात घेता मा. उच्च न्यायालयाने उपरोक्त आदेशान्वये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या श्री. जगदेव सिंग या प्रकरणी दिलेल्या न्यायनिर्णयाचा आधार घेऊन "लाभधारकांना कोणत्याही रकमेचे प्रदान करण्यापूर्वी, त्याला शासनाकडून कोणत्याही रकमेचे अतिप्रदान करण्यात आले आहे, असे भविष्यात निदर्शनास आल्यास अशी अतिप्रदानाची रक्कम लाभधारक, शासनास परत करण्यास बांधील राहील अशा आशयाचे लिखीत वचनपत्र (Undertaking) घेण्यात यावे", असे शासनास आदेशित केले आहे.

या द्वारे सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग / शासकीय कार्यालये / स्थानिक स्वराज्य संस्था / अनुदानित संस्था / स्वायत्त संस्था यांना सुचित करण्यात येते की, कर्मचाऱ्याला कोणत्याही प्रसंगी जसे की, वेतननिश्चिती / वेतनवाढी / अथवा इतर कोणत्याही आर्थिक लाभाच्या / प्रदानाच्या अनुषंगाने अतिरिक्त प्रदान झाल्याची बाब भविष्यात शासनाच्या निदर्शनास आल्यास अतिप्रदानित रक्कम शासनास परत करण्याचे वचनपत्र (Undertaking) संबंधित कर्मचाऱ्याकडून त्यांच्या सेवाकालावधीत एकदाच घेण्यात यावे. जे कर्मचारी सद्य:स्थितीत शासन सेवेत आहेत त्यांच्याकडून हे वचनपत्र या परिपत्रकाच्या दिनांकापासून ३ महिन्यांच्या आत घेण्यात यावे. तथापि जे कर्मचारी सेवानिवृत्त होत आहेत त्यांच्याबाबत तात्काळ त्यांच्या सेवानिवृत्तीपूर्वी घेण्यात यावे. जे कर्मचारी शासन सेवेत नव्याने दाखल / नियुक्त होतील त्यांच्यासंदर्भात हे वचनपत्र नियुक्तीच्या १ महिन्याच्या आत घेण्यात यावे. हे वचनपत्र शासनास विहीत वेळेत भरुन देणे संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना बंधनकारक आहे. सदरचे वचनपत्र संबंधितांनी विहीत कालावधीत न दिल्यास त्यांचे त्यापुढील (विहीत कालावधीनंतरचे) वेतन रोखण्याबाबत आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी. हे वचनपत्र संबंधित कर्मचारी / अधिकारी यांच्या संपूर्ण सेवा कालावधीसाठी लागू राहील याची सर्वांनी नोंद घ्यावी. तसेच हे वचनपत्र घेतल्याबाबतची नोंद सेवापुस्तकात घेण्यात यावी. तसेच सदरचे वचनपत्र सेवापुस्तकात जोडण्यात यावे. सदर कार्यपद्धतीचे पालन करण्याची प्राथमिक जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील. सदर कार्यपद्धतीचे पालन न

झाल्यास संबंधित आहरण व संवितरण अधिकारी योग्य त्या कारवाईस पात्र राहतील याची नोंद घ्यावी. (वचनपत्राचा नमूना सोबत जोडला आहे.)

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२१११२२१३२०५७८३०५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SITARAM JANARDAN KUNTE

Digitally signed by SITARAM JANARDAN KUNTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9815c3f980028edcb4508e57abe43580 49e7f22849abba46cc29adaf9ed9088f, pseudonym=742A553230A8F887226591AE50C137CBDD9B9D72, serialNumber=19E146BF1D34C1BF410061C664DB28C5068DEE984A5EF5BC572D50ECC3993F91, cn=SITARAM JANARDAN KUNTE
Date: 2021.11.24 10:52:22 +05'30'

(सीताराम कुंटे)
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१.सर्व अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई -३२.
२. सर्व प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३.सह सचिव, विधि व न्याय विभाग, ए शाखा / एम शाखा / नागपूर / औरंगाबाद
४. उप सचिव, मुख्य सचिव कार्यालय, मंत्रालय, मुंबई-३२.
५. सरकारी वकील, मा. उच्च न्यायालय, मुंबई उच्च न्यायालय, (अपिलीय शाखा)(रिट सेल), मुंबई
६. सरकारी वकील, मा. उच्च न्यायालय, मुंबई उच्च न्यायालय, (मूळ शाखा), मुंबई
७. सरकारी वकील, मा. उच्च न्यायालय, उच्च न्यायालय, नागपूर / औरंगाबाद
८.संचालक, लेखा व कोषागारे, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई

(शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक संकीर्ण -२०२१/प्र.क्र.५२/सेवा-३, दिनांक २२.११.२०२१ चे सहपत्र)

## वचनपत्र

मी, श्री. / श्रीमती ..............................., ..................या कार्यालयात, ................ या पदावर कार्यरत आहे. मला शासनाकडून कोणत्याही प्रसंगी जसे की, माझी शासनसेवेत नव्याने नियुक्ती होईल तेव्हा किंवा अन्य प्रकारे वेतननिश्चिती / वेतनवाढी / अथवा इतर कोणत्याही आर्थिक लाभाच्या / प्रदानाच्या अनुषंगाने **माझ्या संपूर्ण सेवा कालावधीत,** नियमानुसार अथवा कायद्यानुसार देय व अनुज्ञेय ठरत नसतांना (Excess of entitlements), अतिरिक्त रक्कम प्रदान झाल्याची बाब सद्य:स्थितीत / भविष्यात शासनाच्या निदर्शनास आली / आल्यास, याद्वारे मी असे वचनपत्र देतो की, परिगणनेतील त्रुटीमुळे अथवा कोणत्याही कारणास्तव सदर रकमेमध्ये काही जादा रकमेचे प्रदान केल्याचे सद्यस्थितीत / भविष्यात, शासनाच्या निदर्शनास आल्यास अशी अतिप्रदानाची रक्कम शासनास समायोजन / रोख स्वरुपात परत करण्यास मी न चुकता बांधील आहे / राहील.

सही

ठिकाण :

दिनांक:

नाव............................

पदनाम.......................